अॅग्रोवन

# ‘इको अॅग्रो’ची ऑक्साइड-सस्पेन्शन तंत्रज्ञानाधारित उत्पादने बाजारात दाखल

## मार्केट ट्रेण्ड



**पिंपळगाव बसवंत (जि. नाशिक) येथील कार्यक्रमामध्ये इको अॅग्रोच्या वतीने सात उत्पादनांच्या विक्रीचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी उपस्थित मान्यवर.**

पीक पोषक अन्नद्रव्यात कार्यरत इको अॅग्रो ग्रुपने आपली नवी कंपनी ‘इको अॅग्रो सायन्सेस एलएलपी’मार्फत प्रगत तंत्रज्ञानावर आधारित सात उत्पादने बाजारात आणली आहेत. या नवीन उत्पादनात ‘एससीएल-इटली’ कडील ‘झिंकफ्लो’, ‘लिक्विकॅल’, ‘लिक्विबोर’, ‘न्यूट्रीमॅग’ तसेच ब्रँडन बायोसायन्स - आयर्लंडचे ‘सीविटा’, अमीनोकोर - जर्मनीचे ‘अमीन ऑल’ व ‘इको अॅग्रो सायन्सेस एलएलपी’चे इको ड्रीप ही द्रव्य स्वरूपाची अन्नद्रव्ये आहेत. शुक्रवार (ता. २०) पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक येथे या उत्पादनाच्या विक्री शुभारंभ कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमात बोलताना एससीएल-इटलीमधील पीक पोषण तज्ज्ञ क्लॉज ब्रेकमीयर यांनी अन्नद्रव्यातील नवीन तंत्रज्ञानाशी संबंधित संकल्पना स्पष्ट केल्या. सस्पेन्शन आणि ऑक्साइड उत्पादनांच्या फवारणीद्वारे वापराचे फायदे स्पष्ट केले. झिंकफ्लो, लिक्वीकॅल, नूट्रीमॅग, लिक्वीबोर ही सर्व उच्च प्रमाणात क्रियाशील घटकद्रव्ययुक्त उत्पादनाचे अतिसूक्ष्म कण पानाचा पृष्ठभाग अधिक प्रमाणात व्यापत असल्यामुळे जास्त प्रमाणात शोषले जाऊन कमतरता जलद दूर करतात. फवारणीमुळे पानांची जळ अथवा स्कॉर्चिंग होत नाही. फवारणीसाठी उपलब्ध पाण्याच्या सामूचा विपरीत परिणाम होत नाही. कणांचा आकार नियंत्रित असल्यामुळे त्वरित व हळूहळू दीर्घकाळ परिणाम होत असल्याचे वारंवार फवारणी करावी लागत नसल्याचा दावा केला.

या वेळी बोलताना इको अॅग्रो ग्रुपचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक रवींद्र थत्ते यांनी उत्पादनांची गुणवत्ता व सातत्य या प्रतिकंपनीच्या बांधिलकीचा पुनरुच्चार करून ही उत्पादने शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरतील, असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी ५०० शेतकरी व विक्रेते उपस्थित होते.

Pune, Main
19/09/2019 Page No. 14